# पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली

सांगली-मिरज रोड, विश्रामबाग, सांगली- ४१६४१५

फोन - ०२३३ - २६७२६९६

फॅक्स - ०२३३ – २६७२१००

E Mail- dsb.sangli@mahapolice.gov.in


क्रमांकः-जिविशा/ मोहरम - वाहतुक वळविणे बाबत आदेश /४८९८/२०२६ सांगली दि२४.६.२०२६

ई-4719082

## आ दे श

ज्याअर्थी, दि.२६.६.२०२६ रोजी मिरज शहरात मोहरम सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. त्याकरीता सुरक्षिततेच्या दृष्टीने मिरज शहरात **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४** लागू करणेबाबत माझी खात्री झालेली आहे. **ज्या कारणांसाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४ लागू करावयाचे आहे ती कारणे खालीलप्रमाणे.**

१) मिरज शहरात मोठ्या प्रमाणात मिरवणुकांचे आयोजन करण्यात येते ते पाहण्याकरीता मिरज शहरामध्ये बहुसंख्य लहान मुले, स्त्रिया, पुरुष गर्दी करीत असतात.

२) कोणतेही वाहन गर्दीत घुसुन नागरीकांचे जिवितास धोका पोहोचु नये याकरीता.

त्याअर्थी, मी **तुषार दोशी, पोलीस अधीक्षक, सांगली** मला **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४** अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये **दि.२६.०६.२०२६ रोजी ११.०० वा. ते २४.०० वा. पर्यंत** खालील मार्गावर पोलीस वाहने, ॲम्बुलन्स, फायर बिग्रेड, या वाहनांखेरीज सर्व वाहतूक तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाने वळविण्याचे नियोजन केले आहे.

➤ **मनाई आदेश लागु करणेत येणारे रस्ते व ठिकाणे :-**

**स्टेशन चौक मिरज ते सिरासो दर्गा, मिरज मार्केट, महाराणा प्रताप चौक मार्गे बाँबे बेकरी पर्यंत जाणारा व येणारा रस्ता** (मिरासो दर्गा ते बॉम्बे बेकेरीकडे येणारे सर्व जोडरस्ते.)

**पर्यायी वाहतुक व्यवस्था :-**

१) **टाकळी, बोलवाड व सुभाषनगरकडुन मिरज शहरात येणा-या व जाणा-या वाहनांसाठी –** स्टेशन चौक - फुले चौक - शास्त्री चौक - मंडले पेट्रोल पंप - वखारभाग - गाडवे चौक मार्गे टाकळी बोलवाड, सुभाषनगर मार्गे शहरात जाता व येता येईल. **(परतीचा मार्ग तोच राहिल)**

२) **मिरज शहरातुन मालगांव, सुभाषनगरकडे जाणारे व येणारे वाहनांसासाठी :-** वरील मार्गानेच येता व परत जाता येईल - तरी परंतु महात्मा गांधी चौक - बॉम्बे बेकरी कॉर्नर - आळतेकर हॉल मार्गे मिरज शहरात जाता येईल. (फक्त हलक्या वाहनांसाठी)

३) **छ.शाहु चौक ते मिरज शहर पोलीस ठाणेकडे येणारे वाहनांसाठी :-** महात्मा गांधी चौक - बॉम्बे बेकरी कॉर्नर - आळतेकर हॉल मार्गे (हलक्या वाहनांसाठी) मिरज शहरातुन जाता येईल किंवा स्टेशन चौक मार्गे शास्त्री चौक - वखारभाग - मंडले पेट्रोल पंप - गाडवे चौक मार्गे शहरात येता व जाता येईल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

Office of the Supdt. of Police Sangli

(तुषार दोशी)
पोलीस अधीक्षक, सांगली

ठिकाण :- सांगली.
दिनांक :- दि. .६.२०२६
प्रति,

१. मा. मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे महाराष्ट्र राजपत्र...

Scanned with OKEN Scanner